# शेरशहाचा राज्यकारभार

सूर घराण्याचा संस्थापक शेरशहा सूर हा केवळ एक यशस्वी ठरलेला विजेताच व्हता तर तो एक महान प्रशासक देखिल होता. मध्ययुगीन भारताच्या इतिहासात राज्यकारभार निर्माता म्हणून त्याचे स्थान अतिशय श्रेष्ठ दर्जाचे होते. तो अकबराच्या राज्यकारभाराचा पाया घालणारा किंवा 'मार्गदर्शक' म्हणून ओळखला जातो. यावरून त्याच्या प्रशासन निर्मितीच्या कार्याचे महत्व स्पष्ट होते.

*शेरशहा राज्यकारभाराचा मुळ निर्माता कि सुधारक? शेरशहाच्या राज्यकारभाराचे दोन प्रमुख भाग : (१) शेरशहाच्या मुलकी राज्यकारभार. (२) शेरशहाची लश्करी व्यवस्था (१) शेरशहाचा मुलकी राज्यकारभार अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा (ब) शेरशहाच्या इतर क्षेत्रातील सुधारणा (अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा १) मध्यवर्ती राज्यकारभार २) प्रांतिय राज्यकारभार ३) सरकार किंवा जिल्हा व्यवस्था ४) फरगाणा किंवा तालुका व्यवस्था ५) मौजा (देह) व्यवस्था (ब) शेरशहाच्या इतर क्षेत्रातील सुधारणा १) राजस्व किंवा जमीन महसूल सुधारणा २) अर्थ व व्यापार विषयक सुधारणा ३) कायदे व न्याय विषयक सुधारणा ४) गुप्त हेर खाते ५) दळणवळण व लोककल्याण विभाग ६) धार्मिक धोरण व दानधर्म विभाग २) शेरशहाची लष्करी प्रशासन व्यवस्था किंवा लष्करी सुधारणा*

***शेरशहाचे राजेशाहीबद्दल विचार :-***

शेरशहाचे राज्यकारभार विषयक विचार अतिशय उच्च दर्जाचे होते. म्हणून तो आदर्श राज्यकारभार निर्माण करू शकला. आपल्या वडिलाच्या जहागिरीची व्यवस्था लावण्याच्या काळात त्याने प्रशासनाचे अनुभव मिळविण्या बरोबरच प्रशासनाचे उद्देश व महत्व समजून घेतले होते. प्रजेचा पाठिंबा मिळविण्यासाठी कार्यक्षम व न्यायोचित राज्यकारभार निर्माण करणे यासारखा

Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

तक्रारी ... कनिष्ठ न्यायालयातून दिलेल्या निकाला ... सर्वोच्च न्याय ... तो कनिष्ठ न्यायालयातील न्यायाधिशांच्या नेमणूकाहि तो करीत असे ... घेत असे.

६) दिवाण – ए – बरीद :–

हा विभाग शेरशहाच्या साम्राज्यातील गुप्तहेर विभाग होता. या विभागाच्या प्रमुखास 'बरिद–ए–ममालिक' असे म्हटले जाते असे. त्यास साम्राज्यातील निरनिराळ्या प्रदेशात आपले गुप्तहेर नेमून सर्व प्रकारची माहिती मिळविण्याची व सम्राट शेरशहास पुरविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली होती. याशिवाय त्यास आपल्या राज्याबाहेरील शेजारी राज्यात गुप्तहेर नेमून त्यांच्याकडून माहिती मिळविण्याची कामे करावी लागत असत.

गुप्तहेर खाते व साम्राज्यातील पत्र व्यवहार (दिवाण–ए–इन्शा कडून तयार करण्यात आलेला) संबंधिताकडे पोहचविण्याचे म्हणजेच डाक किंवा पोष्ट विभागाचे काम या विभागाकडेच होते. त्यासाठी साम्राज्यातील सर्व रस्ते व मार्गावर बांधण्यात आलेल्या चौकी किंवा सराईतून घोडेस्वार, सांडणीस्वारांची नेमणूक करण्यात आली होती. त्यासंबंधीची सर्व व्यवस्था दिवाण–ए – बरिद विभागास चालवावी लागत असे.

७) राज परिवार संरक्षण विभाग :–

शेरशहाने राजाच्या परिवारातील लोकांच्या व राजवाड्याच्या संरक्षणाची तसेच दरबार व्यवस्थेची जबाबदारी सांभाळणाऱ्या एखाद्या अधिकाऱ्याची नेमणूक केली असावी. अगोदरच्या सुलतानानी असे अधिकारी नेमले होते. इंग्लंडमधील राजपरिवार संरक्षण विभागाच्या प्रमुखास लॉर्ड हाय स्टेवार्ड (Lord High Steward) म्हणत असत. हा महत्वाचा अधिकारी होता

२) शेरशहाचा प्रांतिय राज्यकारभार :–

शेरशहाने आपल्या साम्राज्याचे विभाजन प्रांतामध्ये केले होते किंवा नाही याबद्दल इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. त्याने आपल्या साम्राज्याचे प्रांतामध्ये नसून त्यापेक्षा लहान जिल्हा पातळीवरील 'सरकार' या विभागात विभाजन केले होते. असे डॉ. कानुन्गो यानी वर्णन केले आहे. या उलट मत डॉ. परमेश्वर सरण या इतिहासकारांनी व्यक्त केले आहे. डॉ आशिर्वादीलाल श्रीवासतव यांनी आपल्या 'The Mughal Empire' (मोगल साम्राज्य) या ग्रंथात व्यक्त केलेले मत अधिक योगय वाटते. त्यांच्या मतानुसार शेरशहाच्या फार अगोदर दिल्ली सुलतानशाही काळापासून भारतात प्रांत अस्तित्वात होते. त्यावर सैन्याच्या सहाय्यानेच नियंत्रण ठेवण्यात येत असल्यामुळे त्याचे स्वरूप लष्करी प्रांत प्रमुखासारखे होते. शेरशहाच्या काळात मात्र प्रांताना 'सुभा' या ऐवजी 'इक्ता' या नावाने ओळखले जात होते. साम्राज्यतील सर्व इक्त्यांचे किंवा प्रांताचे स्वरूप मात्र सारखे नव्हते. लाहोर, पंजाब, माळवा, अजमेर हे प्रदेश लष्करी प्रांत प्रमुखांच्याच ताब्यात होते. डॉ. श्रीवास्तव यांनी केलेले वर्णन ग्राह्य आहे. शेरशहाने प्रारंभि पासून आपल्या ताब्यात असलेल्या बंगाल व बिहारमध्ये प्रांताऐवजी 'सरकार' हे लहान विभाग पाडून त्यानुसार राज्य व्यवस्था लावली होती. पण नंतर जिंकण्यात आलेल्या पंजाब, सिंध मुलतान किंवा माळवा या प्रदेशात 'सरकार' हे विभाग ... शेरशहाला

येतील. अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा (ब) शेरशहाच्या इतर क्षेत्रातील सुधारणा.

अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा ब) शेरशहाच्या इतर क्षेत्रातील सुधारणा अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा :- १) मध्यवर्ती (केंद्रीय) राज्यकारभार. सम्राट शेरशहाचे स्थान. विविध विभाग व विभाग प्रमखांची कामे. २) प्रांतिय राज्यकारभार विविध अधिकारी व कामे. ३) सरकार किंवा जिल्हा प्रशासन ४) परगाणा किंवा तालुका प्रशासन ५) मौजा किंवा देह प्रशासन ब) इतर क्षेत्रातील सुधारणा :-

वरील पैकी प्रथम शेरशहाची प्रशासन यंत्रणा किंवा प्रत्यक्ष राज्यकारभार यंत्रणेचे स्वरूप पाहू.

**अ) शेरशहाची प्रशासन यंत्रणा :-**

शेरशहाने आपल्या पांचच वर्षांच्या कारकिर्दीत आपले विशाल साम्राज्य निर्माण केले होते. त्याच्या साम्राज्यात बंगाल, बिहार, आसामचा कांही प्रदेश, संपूर्ण उत्तरप्रदेश, पाकिस्तान, पंजाब, सिंध, राजस्थान, हरियाणा व माळवा किंवा मध्यप्रदेश या सर्व प्रांताचा समावेश होता. या साम्राज्याची मुलकी व्यवस्था शेरशहाने खालील प्रमाणे लावली होती.

**१) मध्यवर्ती किंवा केंद्रीय राज्यकारभार :-**

शेरशहाने आपल्या साम्राज्याचा मध्यवर्ती राज्यकारभार निर्माण करतांना पुढील प्रमाणे व्यवस्था केल्याचे दिसून येते.

**सम्राट शेरशहाचे स्थान :-**

राजेशाही राज्यकारभारात घडून येणारे सत्तेचे संपूर्ण केंद्रीकरण शेरशहाच्या राज्यकारभारातहि अस्तित्वात होते. सम्राट शेरशहा अनियंत्रितच सम्राट होता. कोणत्याहि स्वरूपाची बंधने त्याच्या अधिकारावर असणे शक्य नव्हते. त्याच्या आज्ञा हेच साम्राज्याचे कायदे होते. त्याने दिलेला न्याय हाच अंतिम स्वरूपाचा होता. तो साम्राज्यातील कोणत्याहि अधिकाऱ्यास त्याच्या मर्जीनुसार नेमू किंवा काढून टाकू शकत होता. शेरशहा हा पूर्णपणे अनियंत्रित सत्ताधिश होता.

**मध्यवर्ती किंवा केंद्रीय राज्यकारभारातील विविध विभाग व विभाग प्रमुखांची कामे :-**

आपल्या साम्राज्याच्या राज्यकारभार सोयीसाठी व कार्यक्षमता वाढविण्यासाठी शेरशहाने राज्यकारभारातील महत्वाच्या कामाचे स्वतंत्र विभाग स्थापन केले होते. प्रत्येक विभागावर एक मुख्य अधिकारी किंवा विभाग प्रमुख नेमण्यात आला होता. प्रमुख विभाग व विभाग प्रमुखांची नावे खालील प्रमाणे होती.

१) दिवाण – ए– वजारत, विभाग प्रमुख – वजीर किंवा प्रतधान. २) दिवाण – ए – आरिझ, सैन्य विभाग प्रमुख. ३) दिवाण – ए – रसालत किंवा दिवाण – ए – मुहतासीब परराष्ट्र विभाग ४) दिवाण – ए – इन्शा, अंतर्गत पत्र व्यवहार विभाग ५) दिवाण – ए – काझा, प्रमुख, दिवाण – ए – काझी न्यायदान विभाग ६) दिवाण – ए – बरिद प्रमुख – बरिद – ए – ममालिक, गुप्त हेरखाते ७) राज परिवार संरक्षण विभाग